**महाराष्ट्रातील सरपंचांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम २०१९/प्र.क्र. २५५/पंरा-३**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
तारीख: ३० जुलै, २०१९

**वाचा -**

1. **शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम २६९९/प्र.क्र. २०६ (२)/पंरा-३, दिनांक २१ जानेवारी,२०००**
2. **शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम २००९/प्र.क्र. १२५/पंरा-३, दिनांक २७ जुलै, २००९**
3. **शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम २०११/प्र.क्र. ४०/पंरा-३, दिनांक ६ सप्टेंबर, २०१४**

**प्रस्तावना -**

महाराष्ट्रातील सरपंच संघटना व लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार व काळाच्या ओघात महागाई निर्देशांकात झालेली वाढ तसेच सरपंचाच्या कर्तव्यात झालेली वाढ विचारात घेऊन व सरपंच मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. मा.मंत्री (वित्त) महोदय यांनी महाराष्ट्र शासनाच्या २०१९-२०२० ग्रा वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना दिनांक १८ जून, २०१९ रोजीच्या भाषणात या कार्यासनाच्या संबधित मुद्द्याबाबत खालीलप्रमाणे घोषणा केली आहे.

“राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून पंचायतराज व्यवस्थेचा पाया असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे मानधन लक्षणीय वाढ करण्याचे प्रस्तावित असून यासाठी सन “२०१९-२०२० ” या आर्थिक वर्षात रुपये २०० कोटी एवढा निधी राखून ठेवण्यात येत आहे.”

संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक ३ अनुसार ग्रामपंचायतीची लोकसंख्यानिहाय वर्गवारी विचारात घेऊन सरपंच ग्रामनिधीतून खालीलप्रमाणे दरमहा सरपंचांना मानधन देण्यात येत होते-

| ग्रामपंचायतींची लोकसंख्यानिहाय वर्गवारी | मानधनाची दरमहा रक्कम (रुपये) | शासन अनुदान टक्केवारी | शासन अनुदानाची रक्कम |
|---|---|---|---|
| अ) ० ते २००० पर्यंत लोक संख्येच्या ग्रामपंचायती | १,०००/- | ७५% | ७५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ब) २००१ ते ८००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | १,५००/- | ७५% | १,१२५/- |
| क) ८००१ पेक्षा जास्त लोक संख्येच्या ग्रामपंचायती | २,०००/- | ७५% | १,५००/- |

## शासन निर्णय-

मा.मंत्री (वित्त) महोदय यांनी महाराष्ट्र शासनाच्या २०१९-२०२० या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने सरपंचाच्या मानधनात वाढ करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच उप सरपंचांना यापुढे मानधन अनुज्ञेय असेल.

ग्रामपंचायतीची लोकसंख्यानिहाय वर्गवारी विचारात घेऊन सरंपचांना आणि उपसरपंचांना खालीलप्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय राहील.

| ग्रामपंचायतींची लोकसंख्या निहाय वर्गवारी | सरपंचांना मानधनाची दरमहा रक्कम (रुपये) | उपसरपंचांना मानधनाची दरमहा रक्कम (रुपये) | शासन अनुदान टक्केवारी | सरपंचांना शासन अनुदान रक्कम | उपसरपंचांना शासन अनुदान रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ) ० ते २००० पर्यंत लोक संख्येच्या ग्रा.पं. (१७३९२) | ३०००/- | १०००/- | ७५% | २२५०/- | ७५०/- |
| ब) २००१ ते ८००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रा.पं. (९८४१) | ४०००/- | १५००/- | ७५% | ३०००/- | ११२५/- |
| क) ८००१ पेक्षा जास्त लोक संख्येच्या ग्रा.पं. (६२१) | ५०००/- | २०००/- | ७५% | ३७५०/- | १५००/- |

सरपंच व उपसरपंच यांना देण्यात येणा-या मानधनावरील खर्चापैकी ७५% खर्च शासन उचलेल. उर्वरित २५% मानधनाची रक्कम संबंधित ग्रामपंचायत स्वनिधीमधून देण्यात येईल.

सरपंच मानधनाचा खर्च मागणी क्रमांक एल-२, प्रधानशिर्ष -२०५३-जिल्हा प्रशासन, ०९३-जिल्हा आस्थापना-(०७)(०१)-ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते आणि कर्मचा-

यांचे किमान वेतन यासाठी अनुदाने (२०५३ १०४२)-३१-सहायक अनुदान याखाली खर्च करण्यात येईल.

सदर शासन निर्णयातील तरतुदी दिनांक ०१ जुलै, २०१९ पासून लागू करण्यात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३११/२०१९/व्यय-१५, दि.३०/७/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३०१५४२५४९२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.07.30 18:19:31 +05'30'

**(असीम गुप्ता)**
**प्रधान सचिव महाराष्ट्र शासन**

प्रत -

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. मंत्री ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
४. मा. राज्यमंत्री ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
५. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषदेचे सदस्य
६. महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र १ / २ मुंबई / नागपूर
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २ मुंबई / नागपूर
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी
९. संचालक, लेखा व कोषागारे
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१२.मुख्य लेखा व वित्त अधिकारी सर्व जिल्हा परिषदा
१३.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, पंचायतराज, पुणे
१४.जिल्हा कोषागार अधिकारी सर्व जिल्हे
१५.सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

१६.सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
१७.सर्व मंत्रालयीन विभाग
१८. ग्राम विकास विभागातील सर्व पर्यवेक्षिय अधिकारी व कार्यासन अधिकारी
१९.निवडनस्ती (का.क्र.पंरा-३)